# नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८० /२०२४ — दि. ३० /०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, नौपाडा** वाहतूक उपविभागाच्या हद्दीत दि. ०३/१०/२०२४ ते दि. १२/१०/२०२४ या कालावधीत **'नवरात्रौत्सव'** सण साजरा होणार आहे. दिनांक १२/१०/२०२४ रोजी देवी मुर्ती विसर्जनाचे दिवशी विसर्जनाचे मार्गावर व परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गोखले रोड कडून तसेच मढवी हाउस कडून तसेच श्रद्धा वडापाव कडून राम मारूती रोडने पु.ना.गाडगीळ चौकातून ग्रीन लीफ हॉटेल मार्गे गडकरी सर्कलकडे तसेच मुस चौकाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **पु.ना. गाडगीळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने राम मारूती रोडने – गजानन महाराज चौक मार्गे – दगडी शाळा – किंवा तीन पेट्रोल पंप मार्गे किंवा अल्मेडा चौक येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) अल्मेडा चौक कडून गजानन महाराज चौक मार्गे राम मारूती रोड व स्टेशन कडे जाणा–या हलक्या चारचाकी, दुचाकी वाहनांना **पु.ना. गाडगीळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने राम मारूती रोड – गोखले रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) अम्लेडा चौकातून गजानन महाराज चौक मार्गे पु.ना. गाडगीळ – ग्रीन लीप मार्गे स्टेशनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या बसेस, अवजड वाहने यांना **गजानन महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गजानन महाराज चौकातून उजवे वळण घेवून तीन पेट्रोल पंप हरिनिवास सर्कल मार्गे गोखले रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ठाणे रेल्वे स्टेशन कडून ठाणे महानगर पालिकेच्या बसेस, तसेच एस टी महामंडळ बसेस तसेच चार चाकी व दुचाकी वाहनांना गडकरी सर्कल कडे जाण्यास **मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने स्टेशन कडून मुस चौक – टॉवर नाका, चिंतामणी चौक, गडकरी सर्कल, अल्मेडा सिग्नल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) चरई कट धोबी आळी मार्गे टेंभीनाका येथे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना माय लेडी फेअर टॉवर जवळ **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने माय लेडी फेअर टॉवर – चरई कट पुढे खोपट सिग्नल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** अ) टॉवर नाका – गडकरी रंगायतन – बोटिंग क्लब पर्यंत मासूंदा तलाव रोडचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

ब) ठाणे महानगर पालिका भवन ते अल्मेडा चौक व ठाणे महानगर पालिका भवन ते ओपन हाउस, आराधना क्रॉस, आंपन हाउस ते भक्ती मंदिर दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहनेउभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. १२/१०/२०२४ या कालावधीत दुपारी १४.०० वाजेपासून मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील. सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे**
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व प्रभारी अधिकारी, ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उपविभाग.**
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner


LBS Marg
Jondhali Baug Rd
Ganesh Theatre
Edulji Rd
B P Rd
Lazarus Rd
Almeda Rd
Kaka School Path
Ram Maruti Rd
Instasculpt Clinic
Govind Bachaji Rd
Ahilyadevi Holkar Marg
Talao Pali
Shivaji Path
Sonumiya Rd
Agyari Ln
Station Rd
Shree Kopineshwar Temple
Kadval Ln
Devidas Rd
Balwantrai Mehta Marg
District & Sessions Court, Thane
Dadoji Konddev Stadium
Fire Brigade Rd
Jail Rd
Old Pu
PNG

CamScanner